‘प्रभावित’ होण्याच्या वेगवेगळया छटा असतात. चित्रपटातला वेगळा आशय ‘भावणं’, कथनशैलीच्या प्रकारामुळे ‘आकर्षित’ होणं, तसंच संकलन, छायाचित्रण, ध्वनीसंयोजन, संगीत, अभिनय, दिग्दर्शन इत्यादी तांत्रिक घटकांनी अनुभवाचा ‘विशेष ठसा उमटवणं’ किंवा यापैकी एखाद्या घटकाला ‘उत्स्फूर्त दाद दिली जाणं’. हे असं ‘प्रभावित होणं’ तात्कालिक असतं आणि चित्रपटाच्या ‘चांगल्या’, ‘दर्जेदार’, ‘अप्रतिम’ किंवा ‘लोकप्रिय’ ठरण्यासाठी महत्वाचंही असतं. पण या पलीकडे जाऊन कोणत्याही प्रकारचा ‘चिरंतन’ अनुभव देण्याचं सामर्थ्य ज्या चित्रपटात असतं तो चित्रपट माझ्यासाठी ख-या अर्थाने ‘प्रभावित’ करणारा ठरतो. The film I feel influenced by as opposed to impressed with, truly and deeply affects me. माझ्यावर असा परिणाम करणा-या दिग्दर्शकांबद्दल मी नंतर थोडं सविस्तर लिहीणार आहे. पण चित्रपट क्षेत्रातला एक कलावंत असल्याने आणि अभिनेता, दिग्दर्शक, निर्माता अशा स्तरांवर वावर असल्यामुळे सिनेमा हे माध्यम माझ्यासाठी साहजिकच Demystify होतं आणि कालांतराने स्वत:च्या अभिरूचीला जास्त धार येत जाते. मग ‘प्रभावित’ होण्याच्या कक्षाही थोडयाफार मर्यादित होत जातात. अशा अती वैयक्तिक कक्षेच्या पलीकडे जाऊन या माध्यमाच्या योगदानाचा व्यापक विचार करण्याचा प्रयत्न मी इथे करणार आहे.

एखाददुस-या रसिकाला वा कलवंताला काही काळ प्रभवित करणा-या कलाकृती अगणित असतात पण अनेक सृजनशील कलावंतांना दीर्घकाळ प्रभावित करणारी कलाकृती दुर्मिळ असते; त्या कलाकृतीचे कलेच्या प्रांतात उमटलेले पडसाद वेगवेगळया अंगांनी, निरनिराळया रूपांनी कितीतरी वर्ष घुमत राहयलेले दिसतात. १९२५ साली बनलेला ‘बॅटलशिप पोटेमकिन’ हा फक्त ७५ मिनीटांचा रशियन मूकपट! जगभरातल्या कित्येक दिग्दर्शकांना आणि कोटयावधी प्रेक्षकांना प्रेरणा देण्याचं काम झारच्या जुलमी राजवटीविरूद्ध बंड पुकारणा-या खलाशांच्या शौर्यगाथेवरच्या या कृष्णधवल चित्रपटाने वर्षानुवर्ष केलं. (१९३२ पासून आजतागायत प्रकाशित होणा-या ब्रिटीश फिल्म इन्स्टिटयूटच्या ‘साईट ॲन्ड साऊन्ड’ या प्रख्यात मासिकाने १९५२ मध्ये, त्यांना प्रभावित केलेल्या १0 सर्वोत्कृष्ट चित्रपटांची सकारण निवड करायला जगभरातल्या सगळया नामवंत दिग्दर्शकांना सांगितलं. त्या दिग्गजांनी निवड केलेल्या यादीनुसार ‘बॅटलशिप पोटेमकिन’ ही पहिल्या क्रमांकाची कलाकृती ठरली. त्यानंतर दर दहा वर्षांनी निवड केल्या गेलेल्या याद्यांमध्ये हा चित्रपट अग्रस्थानी राहयला. अगदी हल्ली २0१२ मध्ये, त्याचं स्थान ११ वर घसरलं.) आणखी एक उदाहरण - व्हिटोरिया डिसिका या इटालियन दिग्दर्शकाने १९४९ साली बनवलेल्या ‘बायसिकल थीव्ज’ या कृष्णधवल चित्रपटामुळे जगभरातले दिग्दर्शक इतके प्रभावित झाले की तात्कालीन सिनेमाचा चेहरामोहराच बदलला. तोपर्यंत indoor किंवा outdoor चित्रीकरण फक्त स्टुडियोतच केलं जायचं. ही प्रथा नाकारून डिसिकाने प्रत्यक्ष स्थळावर जाऊन, उपलब्ध सूर्यप्रकाशाचा वापर

करून चित्रपट बनवण्याचा नवा मार्ग दाखवला. आपल्या देशात १९५२ मध्ये पहिल्यांदाच आयोजित केल्या गेलेल्या आंतरराष्ट्रीय चित्रपटमहोत्सवात हा चित्रपट बघितल्यानंतर प्रभावित होऊन बिमल रॉयनी ‘दो बिघा जमीन’ बनवला; राजकपूरने ‘बूटपॉलिश’ आणि ‘जागते रहो’ या चित्रपटांची निर्मिती केली. सत्यजित रायनीसुध्दा ‘पथेर पांचाली’ बनवला तो ‘बायसिकल थीवज’ बघितल्यावर; “असाही सिनेमा असू शकतो? मला असाच सिनेमा बनवायला आवडेल!” अशी धारणा झाल्याचं त्यांनी प्रांजळपणे नोंदवून ठेवलं.

आज ‘मला प्रभावित करून गेलेला सिनेमा’ निवडायला सांगितलं तेव्हा असा एकच चित्रपट निवडणं अशक्य आहे, असं माझ्या लक्षात आलं. मग मी एखाद्या दिग्दर्शकाच्या कारकीर्दीचा आणि संपूर्ण कलात्मक प्रवासाचा एकसंध विचार करून त्याने माझ्यावर केलेल्या प्रभावाचं मूल्यमापन करायचा प्रामाणिक प्रयत्न केला. परदेशी दिग्दर्शकांपैकी आकिरा कुरोसावा, इन्गमार बर्गमन, आन्द्रे वायदा, क्रिस्तॉफ किस्लोस्की, आन्द्रे तारकोवस्की, वूडी ॲलन...आणि अशा अनेक दिग्गजांनी मला समृध्द केलं. ह्याच नामावळीत आपल्या मातीतल्या व्ही.शांताराम, के.असिफ, बिमल रॉय, गुरूदत्त, सत्यजित राय, ऋत्विक घटक, मृणाल सेन पासून ते अगदी राजा परांजपे, श्याम बेनेगल यांची नावंही जोडायला हवीत. तसंच ह्या प्रख्यात यादीत फारशी माहीत नसलेली पण मला खूप आवडणारी दोन नावं - मिख्लोस यान्चो (JANSCO) हा हंगेरियन दिग्दर्शक आणि यिल्माझ ग्युने (GUNEY) हा तुर्कस्तानी दिग्दर्शक! यान्चोने त्याच्या पन्नास वर्षांपेक्षा जास्त प्रदीर्घ कारकीर्दीत हंगेरीतल्या सत्ताधारी कम्युनिस्ट राजवटीच्या विरोधात चित्रपट बनवले.ग्युनेने त्याच्या देशातल्या दडपशाही करणा-या राजवटीविरूध्द आवाज उठवणारे चित्रपट बनवले - चक्क तुरूंगातून त्याच्या सहका-यांना कधी चिठयाचपाटया पाठवून तर कधी सविस्तर सुचना देऊन! त्यावरून आठवण झाली - अगदी अलीकडे २०१०मध्ये ज़फर पनाही या इराणी दिग्दर्शकाला ‘सरकारविरोधी कारवाया आणि देशद्रोह’ अशा आरोपांखाली अटक करून तुरूंगात टाकल्याचं समजल्यावर जगभरातल्या कलावंतांनी त्या कृत्याचा निषेध केल होता. पनाहीला सहा वर्षांचा तुरूंगवास आणि चित्रपट बनवण्यावर २० वर्षांची बंदी घालण्यात आली आहे. शिवाय पटकथा लिहीणं आणि कोणतीही मुलाखत देणं या गोष्टींची मनाई आहे; फक्त वैद्यकीय उपचारांसाठी किंवा हाजयात्रेला जाण्यासाठी देशाबाहेर जाण्याची मुभा आहे. असं असूनही पनाहीने तुरूंगातून ‘This is not a film’ नावाची एक व्हिडियो डायरी बनवून देशाबाहेर स्मगल केली जी २०११ च्या कान महोत्सवात दाखवली गेली. यंदाच्या बर्लिन महोत्सवात पनाहीच्या पटकथेवर बनवलेल्या ‘Closed curtain’ या चित्रपटासाठी त्याला सर्वोत्कृष्ट लेखनाचा ‘गोल्डन बेअर’ पुरस्कार देण्यात आला. तसंच काहीसं ‘द पेशन्स स्टोन’ आणि ‘द अर्थ ॲन्ड ॲशेस’ या दोन चित्रपटांविषयी वाटतं. अफगाणीस्तानात तालीबान विरोधी ठाम भूमिका घेणा-या प्रक्षोभक चित्रपटांचं दिग्दर्शन आणि निर्मिती करणारा अतीक

रहिमी! बंडखोरीचा ध्वज उभा केलेले असे चित्रपट 'प्रभावित' होण्याचे वेगळे पदर उलगडून दाखवतात.

माझ्या कॉलेजच्या दिवसात, चित्रकलेच्या प्रांतात नवनवीन गोष्टी शिकत असतानाच इंग्रजी चित्रपट बघण्याची गोडी लागली. या गोडीला वेगळी दिशा मिळाली ती 'फिल्म फोरम' नामक फिल्म सोसायटीमध्ये बघितलेल्या अनोळखी भाषेतल्या एका चित्रपटामुळे ! हॉलीवूडच्या तोवर पाह्यलेल्या उत्कृष्ट चित्रपटांपेक्षा सर्वार्थाने वेगळया अशा 'सेवन्थ सील'ने पहिल्यांदाच मला अंतर्मुख होण्याचा अनुभव दिला. त्या पाठोपाठ, बर्गमनच्याच 'वाईल्ड स्ट्रॉबेरीज' 'व्हर्जिन स्प्रिन्ग' 'थ्रू अ ग्लास डार्कली' सारख्या चित्रपटांनी माझ्यातल्या दृष्यकलेच्या भानाला नवी दृष्टी दिली. नंतर अनेक वर्षांनी या अद्वितीय दिग्दर्शकाने प्रभावित केलेल्या प्रख्यात दिग्दर्शकांची लांबलचक यादी वाचून मला भरून आलं. स्वत: अनेक अजरामर कलाकृती तयार करणा-या किस्लोवस्कीने बर्गमनविषयी म्हटलंय, "मानवी अंतरंगाबद्दल दोस्तोवस्की किंवा काम्यूने जे काही साहित्यात सांगितलं, त्या दर्जाचा अनुभव चित्रपटातून देणारी बर्गमन ही बहुदा एकमेव व्यक्ती असावी!" बर्गमनचं बोट धरून पुढे जाताजाता हॉलीवूडपेक्षा कितीतरी वेगळया उंचीवर घेऊन जाणारा सिनेमा बघण्याचं भाग्य मला लाभलं. स्वीडिश, जपानी, पोलीश, हंगेरियन, फ्रेन्च, इटालियन, जर्मन अशा अजिबात न समजणा-या भाषांमधले चित्रपट माझ्या जाणीवांना नवनवीन परिमाणं देत गेले. तरूणपणी आडवळणाच्या छोटयाशा गल्लीतल्या ताराबाई हॉलपासून सुरू झालेला हा प्रवास नंतरच्या काळात, तीर्थयात्रेला जाण्याच्या भावनेने आंतरराष्ट्रीय महोत्सवांना हजेरी लावण्यापर्यंत चालूच राह्यला आहे. 'अनवट' चित्रपट पाहण्याच्या वीसेक वर्षांच्या या संपूर्ण कालखंडानेच मला 'प्रभावित' केलं होतं असं म्हणायला हवं.

१९५0च्या दशकात भारतीय चित्रपटसृष्टीत नव्या वाटा धुंडाळणा-या चित्रपटांचा प्रवास पुढच्या कालखंडात कसा झाला याचा मागोवा घेणं महत्वाचं ठरेल. १९६0च्या दशकाची सुरूवात बिमल रॉयच्या 'परख'ने झाली. अजून बाल्यावस्थेत असलेल्या आपल्या लोकशाहीवर नर्म विनोदी भाष्य करणा-या ह्या चित्रपटानंतर, ६१ साली यश चोप्राने फाळणीच्या पार्श्वभूमीवर खदखदणारा जातीयवाद आणि धर्मांध प्रवृत्तींवर कोरडे ओढणारा 'धर्मपुत्र' बनवला. या आधी १९५९ साली, ह्याच तरूणाने कुमारी मातृत्वाच्या प्रश्नाला वाचा फोडणारा 'धूल का फूल' बनवून दिग्दर्शक म्हणून पदार्पण केलं होतं. (तरल प्रेमकहाण्या सांगणारा 'बॉलीवूड'चा अनभिषिक्त बादशहा हे बिरूद अगदी अलीकडच्या काळात त्याला लावलं गेलं.) १९६२मध्ये गुरूदत्तचा 'साहेब बीवी और गुलाम', ६३मध्ये के.ए.अब्बासचा 'शहर और सपना' आणि बिमल रॉयचा 'बन्दिनी' ! त्या मागोमाग १९६६मध्ये बासू भट्टाचार्यचा 'तीसरी कसम' सारखे बदलत्या सामाजिक आणि नैतिक मूल्यांशी अडखळणा-या सामान्य माणसाच्या अंतर्द्वंद्वाचं भान देणारे एकाहून एक महत्वाचे चित्रपट बनले. मुख्यधारेच्या महासागरात प्रवाहाविरूध्द जाण्याचे असे प्रयत्न हिंदी भाषिक चित्रपटात होत असताना, त्याच कालखंडात

बंगाली भाषेत ऋत्विक घटकचा 'मेघे ढाका तारा' सत्यजित रायचा 'महानगर' आणि तपन सिन्हांचा 'अपनजन' आले. शहरांमध्ये झपाटयाने येणा-या बकालीकरणावर प्रभावी कलात्मक भाष्य करणा-या या चित्रपटांना प्रेक्षकांनी भरघोस प्रतिसाद दिला होता. आपल्या चित्रपटसृष्टीच्या १00 वर्षांच्या वाटचालीतला 'मेघे ढाका तारा' हा अत्यंत प्रेरणादायक असा मैलाचा दगड मानला जातो आणि तपनदांच्या 'अपनजन'ची हिंदी प्रतिकृती म्हणजे गुलज़ारचा 'अपने पराये'! आपल्या मराठीतसुध्दा राज परांजपेंचा 'जगाच्या पाठीवर' आणि भालजी पेंढारकरांचा 'साधी माणसं' याच दशकातले! आणखी एक महत्वाची घटना म्हणजे १९६५साली, रामू करियात या तरूण दिग्दर्शकाने मच्छीमारी करणा-या लोकांचं जीवन आणि त्यांचे सागराशी असलेले ऋणानुबंध दाखवणारा 'चेम्मीन' नावाचा चित्रपट बनवून दाक्षिणात्य सिनेमात खळबळ माजवली. तोपर्यंत बहुतांशी कामोत्तेजक चित्रपटांची पैदास करणारा प्रदेश अशी ओळख असलेल्या मल्याळम सिनेमाला तुटपुंज्या बजेटमध्ये बनलेल्या, ऋषिकेश मुखर्जींचं संकलन आणि सलील चौधरींचं संगीत लाभलेल्या या फिल्मने नवा तोंडवळा दिला.

या पार्श्वभूमीवर आणि अशा चित्रपटांना लाभलेल्या लोकाश्रयामुळे असेल कदाचित, मुख्य धारेतल्या धंदेवाईक सिनेमाला सशक्त पर्याय म्हणून भारत सरकारने फिल्म फायनान्स कॉर्पोरेशनची स्थापना केली जिचं पुढे NFDC मध्ये रूपांतर झालं. FFC/NFDCने सुरूवातीच्या काळात निर्माण केलेल्या चित्रपटांकडे नुसता दृष्टीक्षेप टाकला तरी ठरावा. प्रतिथयश लेखक राजिन्दरसिंग बेदींचा 'दस्तक', कुमार शहानीचा 'मायादर्पण', मृणाल सेनचा 'एक अधूरी कहानी', मणि कौलचा 'दुविधा' आणि मुझफ्फर अलीचा 'गमन' या प्रत्येक चित्रपटाने भारतीय चित्रपटाच्या भाषेत एक छोटीशी पण महत्वाची भर घातली. याच १९७0च्या दशकात, सत्यजित रायचा 'प्रतिद्वंद्वी' आणि मृणाल सेनचा 'इन्टरव्ह्यू' हे तरूणाईच्या व्यथांना भिडणारे चित्रपट आले तर मराठीत सत्यदेव दुबेने पथदर्शक 'शांतता कोर्ट चालू आहे' बनवला आणि जब्बार पटेलने 'सामना'; शिवाय राजदत्तांचा 'देवकीनन्दन गोपाला' आणि जयू-चिनू पटवर्धनांचा '२२ जून' सारखे भारतीय चित्रपटसृष्टीला मराठीची पुन्हा एकदा दखल घ्यायला लावणारे चित्रपटही या दशकातलेच. तसंच मल्याळीमध्ये अरविन्दनच्या 'उत्तरायण' आणि 'कांचनसीता' सारख्या सिनेमांमुळे नवीन युगाची पहाट झाली आणि त्या पाठोपाठ 'स्वयंवरम'ने आदूर गोपालकृष्णनच्या प्रदीर्घ कारकीर्दीची सुरूवात झाली. सत्तरीच्या दशकातून ऐंशीच्या दशकात मराठी सिनेमाने प्रवेश केला तो जब्बार पटेलच्या 'उंबरठा' आणि माझ्या 'आक्रीत'सारख्या केवळ भारतीयच नाही तर आंतरराष्ट्रीय चित्रपटसृष्टीला दखल घ्यायला लावणा-या कलाकृतींनी!

यंदाच्या वर्षी, आपल्या भारतीय चित्रपटसृष्टीला शंभर वर्षं पूर्ण झाली. त्यानिमित्ताने अनेक सोहळे साजरे केले गेले; आठवणींची उजळणी झाली; अजरामर प्रणयगीतं आणि इतर गाण्यांवर चित्रित केलेल्या नृत्यांचे तुकडे जोडून नवीन गोधडया ्शिवल्या गेल्या; एकूणच गौरवशाली परंपरेतल्या चित्रपटांच्या

योगदानाची गाथा सांगितली गेली. हे आजच्या झटपट instant संस्कृतीला साजेसं आणि remix च्या जमान्यात चपखल बसणारं असल्यामुळे आपल्याला खटकलंही नाही. ह्या सगळया 'लखलख चंदेरी' झगमगाटात एक गोष्ट आपल्या लक्षात येईल की आज मागे वळून बघताना आम्हाला हिंदी मधल्या मुख्य धारेतल्या चित्रपटांची आठवण वारंवार करून दिली गेली. शोले, दीवार, दिलवाले दुल्हनिया...झालंच तर मुगले आज़म यासारख्या बॉक्स ऑफीसवर विक्रम करणा-या चित्रपटांची! पण प्रादेशिक सिनेमाला मात्र अनुल्लेखानी मारलं. तसंच हिंदीतल्या भुवन शोम, तीसरी कसम, गरम हवा किंवा बन्दिनी, दस्तक, सत्यकाम सारख्या चित्रपटांना स्मृती आडच ठेवलं गेलं. खरं तर सामाजिक भान असलेल्या, प्रवाहाबाहेर जाऊन वेगळी दिशा दाखवणा-या सिनेमाचं स्मरण करणं महत्वाचं आहे. वेगवेगळया पायवाटांच्या टप्याटप्यांवर आधीच्या पिढयांनी उमटवलेल्या या छोटयामोठया पाऊलखुणांचा मागोवा घेताना तरूण पिढीला नव्या वाटा सापडतात, असा माझा विश्वास आहे. कालातीत वा कायम स्वरूपाचा अनुभव देणा-या कलाकृती निर्माण होण्याची शक्यता वाढवण्यासाठी अशा retrospective ची नितांत गरज आहे.

या सगळया पार्श्वभूमीवर मला प्रभावित करून राह्यलेल्या हंगेरियन दिग्दर्शक यान्चो विषयी थोडंसं -

ज्या कालखंडात यान्चोच्या 'इलेक्ट्रा' चित्रपटाशी माझी भेट झाली तेव्हा चित्रकार म्हणून मी स्वत:ची ओळख शोधत होतो, नाटयक्षेत्रात माझी लुडबूड नुकतीच सुरू झाली होती आणि चित्रपटाशी संबंध 'बघण्या' पुरताच होता. त्यामुळे चित्रपटाच्या तांत्रिक अंगांची जाणही फारशी नव्हती. पण यान्चोचा चित्रपट सुरू झाल्यावर काही क्षणातच पहिली गोष्ट जाणवली ती अशी की खूप संपणा-या लांबच लांब शॉटसोबत बघता बघता माझा श्वास रोखलाय; माझ्या शेजारच्या प्रेक्षकाची बोटंही खुर्चीच्या हातावर आवळली आहेत; पडद्यावर दिसणा-या एका विस्तीर्ण माळरानावर जाणा-या मिरवणूकीमधून वावरणारी चित्रपटातली प्रमुख पात्रं; त्यांच्या लयबध्द हालचाली choreographed असूनही वास्तववादी शैलीतल्या घटनांशी संबंध जोडणा-या; एवढयात दृष्यात अचानक मिरवणुकीच्या समोरून आणि  दृष्यमालिकेमध्ये काही वेळानंतर प्रमुख पात्रं बोलत बोलत वळून परत जात असताना सूर्यास्त झालेला दिसतो तेव्हा त्याच टेकडीवर पसरणा-या संधीप्रकाशात आधीचीच मिरवणूक हातात भल्या मोठया मेणबत्त्या घेऊन येताना दिसते आणि मला पुन्हा एकदा जाणवलं की अजूनही शॉट कट झालेला नाही, मघाचाच शॉट चाललाय. मला असंही जाणवतं की मी, माझ्या दोन्ही बाजूचे शेजारी आणि आमच्यासकट सगळे प्रेक्षक शॉट संपल्यावर मगच श्वास घेतील अशी अवस्था प्रेक्षागृहात आहे. फक्त १३ शॉटसमध्ये बनवलेल्या, अमूर्तवादी घाटाच्या, रूपकात्मक कथनशैलीचा वापर करून साकारलेल्या ह्या चित्रपटाची कित्येक पारायणं मी आजवर केली तरी दरवेळेला एखादा ताजा बनवलेल्या चित्रपटात प्रकर्षाने जाणवतो तो आपल्याला स्वप्नवत अवस्थेत घेऊन

जाताना जुलमी राज्यकर्त्यांच्या दडपशाहीवर आसूड ओढणारा क्रांतीकारी यान्चो! सिनेमा माध्यमावरची जबरदस्त पकड वापरून कवीमनाचा आकांत हळुवारपणे दाखवणारा मनस्वी यान्चो! कलाक्षेत्रात नुकतं पाऊल टाकलेल्या माझ्यासारख्या नवशिक्या तरूणाला चित्रपटमाध्यमाच्या कक्षा विस्तीर्ण क्षितीजापर्यंत नेऊन दाखवणारा हा यान्चो त्याच्या वयाच्या नव्वदीमध्येसुध्दा आज चित्रपट बनवतो आहे आणि त्याच्या प्रत्येक नवीन कलाकृतीतून कित्येकांना नव्याने प्रेरणा देतो आहे. नवशिक्या मुलाच्या उत्साहानेच यान्चोला भेटावं...त्याच्या प्रतिभेविषयी आणि कलाकृतींविषयी अगणित प्रश्न विचारावेत...त्यामुळे त्या अमूर्त, दृष्यकाव्यात्मक चित्रबंधांविषयीचा गुंता सुटेल की वाढेल – हा सुध्दा सृजनाचाच एक बोचरा खटाटोप! एखादा कलावंत आणि त्याची कलाकृती अशी जिज्ञासा, कुतूहल आणि प्रेरणा जर इतकी वर्षं जिवंत आणि ताजी ठेवू शकत असेल तर ते ‘प्रभावशाली’ ठरत नाही का?

**अमोल पालेकर**